राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची तत्त्वचिंतनशीलता आणि जीवनदृष्टी

प्रा. डॉ. विठ्ठल रामा जीवतोडे
गोपिकाबाई साताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड जिल्हा यवतमाळ
jiwatode@gsgcollege.edu.in

प्रस्तावना

महाराष्ट्राला अनेक थोर संत लाभले आहेत. त्यातीलच एक महत्त्वाचे नाव म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे. त्यांनी महाराष्ट्र राज्य तसेच देशाच्या पुनर्निर्मितीसाठी फार मोठे आणि अमूल्य असे योगदान दिले आहे. त्यांचा जन्म 30 एप्रिल 1909 रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या गावात झाला होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्रातील एक थोर आध्यात्मिक संत होते. त्यांनी यावली, अमरावती येथूनच आपल्या सामाजिक कार्याला सुरूवात केली होती. त्यांनी त्याचसोबतच संपूर्ण भारभर आध्यात्मिक, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक एकात्मतेचे प्रबोधन केले होते. एवढेच नाही तर स्वातंत्र्य आणि समतेसाठी लढणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी जपानमध्ये जाऊनही विश्वबंधुत्वाचा संदेश दिला होता.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना तत्त्वज्ञानाचे फार चांगले ज्ञान होते. सर्वात आधी खेड्यांचा विकास झाला, तरच देशाचा विकास होईल, अशी त्यांची धारणा होती. त्यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागांतील अनेक समस्यांचे निवारण करण्यासाठी पुढाकार घेतला होता. अंधश्रद्धा, जातीभेदाच्या निर्मुलनासाठी त्यांनी भजन, कीर्तनातून प्रबोधन केले. त्यांचे योगदान लक्षात घेता तात्कालीन राष्ट्रपीत डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना राष्ट्रसंत ही पदवी बहाल केली होती.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्रातील संत परंपरेचा वारसा चालवणारे आधुनिक काळातील संत होते. भारतातील बहुसंख्य जनता खेड्यात राहते त्यांच्या श्रमातून संपूर्ण देशाची पोषण होत असते. परंतु या जनतेकडे सगळ्यांचेच दुर्लक्ष झालेले असते. ही जनता सुधारावी, अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा या दोषांपासून मुक्त व्हावे याकरता 'ग्रामगीता' या ग्रंथाचा प्रपंच त्यांनी केला. सामान्य जनतेला स्वतःचा उद्धार स्वतः करण्यासाठी प्रवृत्त करावे या उद्देशाने या ग्रंथाची निर्मिती त्यांनी केली. या ग्रंथातून आपला अनुभव व विचार स्वतंत्रपणे मांडीत असले तरी ते गुरु व शास्त्र यांना अनुसरूनच त्यांनी मांडले आहेत त्या ग्रंथाच्या निर्मितीकाळी त्याच्या डोळ्यासमोर प्रामुख्याने ग्रामीण जनताच असली तरी तो ग्रंथ एकूण मानवी जीवनाचे कल्याण लक्षात घेऊनच लिहिला आहे.

ग्रामगीतेशिवाय तुकडोजी महाराजांनी लिहिलेल्या विपुल भजनांमधून राष्ट्रीय, सामाजिक आणि आध्यात्मिक स्वरुपाचा आशय प्रकट झाला आहे. पारतंत्र्याची चीड, ईश्वररूपी जनता-जनार्दनाला स्वातंत्र मिळवण्यासंबंधी केलेले आव्हान, त्याकरता केलेले विभूतीपूजन, भारताच्या प्राचीन उज्ज्वल परंपरेची जनसमुदायाला करून दिलेले समरण इत्यादी विषय या प्रश्नावरून ठळकपणे प्रकट झालेले आहेत. समकालीन स्थिती गतीशी त्यांचा सतत संपर्क असल्यामुळे लोक शिक्षणाच्या निमित्ताने आर्थिक विषमतेवर वर्णद्वेष यावर आपल्या अभंगातून त्याने कडवट टीका केली आहे. या सर्वच विचारांचा विचारांना ईश्वरी प्रेरणांचे अधिष्ठान लाभले आहे स्वतंत्र भक्तीपर रचना आणि पायाभूत ईश्वरी अधिष्ठानावर उभारलेली तर विराट विचार प्रकट करणारे त्यांचे अभंग त्यांना लाभलेल्या लोकप्रिय चालीमुळे जनसामान्यांमध्ये अतिशय वेगाने प्रसार पावले आहेत

तुकाराम महाराजांचे अभंग तो मधुर आवाजात गात असे. 'यावली' या त्यांच्या गावाजवळच वरखेड या गावी माणिकचे मामा होते. त्यांच्याकडे तो शिक्षणासाठी गेला होता तिथे आडकोजी नावाच्या महाराजांशी त्यांची गाठ पडली. ते माणिकला तुकड्या या नावाने हाक मारीत. मानिकच्या तोंडून तुका म्हणे ही नाममुद्रा ऐकून आडकोजी महाराज त्याला म्हणाले, तुका म्हणे रे? तुकड्या का म्हणत नाहीस?" हे ऐकून माने स्वरचित भजने करू लागला. गावात भजने म्हटल्यावर मिळेल तो भाकरतुकडा खायचा, असा महाराजांचा दिनक्रम सुरू झाला. तुकडोजी म्हणतात –

"माझे जन्मनाव 'माणिक सांगती |
परी माझी मती तैशी नाही |
तुकड्या नावाने लोकीं मी खेळलो |
उजेडी आलो तुकडे खाता ||"

माणिक स्वभावाने लहानपणी हुड व खोडकर होता. तो शाळेत रमत नसे. पोहाणे, झाडावर चढाणे व देवळाजवळ ध्यान लावून बसणे हे याचे नाद होते. योगायोगाने 'सातळी कोतळीकर' या महाराजांशी त्यांची भेट झाली हे महाराज व आडकोजी महाराज यांचा कृपाप्रसाद त्याला लाभला. त्याची सहजच ध्यान, समाधी लागली. या सुमारास तो पंधरा सोळा वर्षाचा होता. चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा या नावाच्या दाट अरण्यात ध्यान लावून ईश चिंतन करत होता. त्या प्रसंगी एक तेजस्वी प्रकाश– ज्योत त्याच्या दृष्टीपुढून पसरत गेली. गुलामगिरीत खितपत पडलेल्या मातृभूमीला मुक्त केले पाहिजे आणि भक्तीच्या माध्यमातून राष्ट्राचा भाग्योदय घडून आणला पाहिजे, असे विचार त्याच्या मनात आले. देवभक्तीकडून देशभक्तीकडे तो वळू लागला. धार्मिक भजननाबरोबर राष्ट्रीय भजने करू लागला आणि त्यासाठी तो घरदार सोडून गाव गाव हिंडू लागला. वडिलांनी त्याला तुकुम या गावी शोधून काढले. त्याची आई आजारी असल्याची व त्याची आठवण काढत असल्याची त्यांनी बतावणी केली. त्यावर 'पुत्रप्रेम काय गोड? अवघे मायिक थोतांड' असे सांगून घराकडे परतण्याचे त्याने नाकारले.

भजनासह, कथाकीर्तन व तीर्थाटन यांच्या निमित्ताने तुकडोजी महाराजांच्या देशात अनेक भागातून परिभ्रमण करीत या भ्रमण यात्रेत त्यांनी दऱ्याखोरी पाहिली. साधू जनांचे आश्रम पाहिले आणि नानाविध क्षेत्रातील व्यक्तींच्या गाठीभेटी घेतल्या. मात्र हटातटाने जटा रंगवणाऱ्या बुवाबाजापेक्षा साध्या राहणीचे उच्च विचार करण्याचे तंत्र त्यांनी जवळ केले. 'संत ओळखावा वृतीवरून । अथवा सद्गुण पाहोनिया ।। अशी खूण त्यांनी सांगितली आहे.

आपल्या भजनाच्या व वाद्यांच्या माध्यमातून महाराजांनी लोकशिक्षणाचे मोठेच काम केले नागपब अमरावती मार्ग वाडी मोझरी गुरुकुंज आश्रम स्थापन केला. कालांतराने या आश्रमाची कार्यक्षमता वाढत गेली. ग्रामोद्योग, व्यायामशाळा, गोरक्षण कृषी केंद्र दवाखाना शाळा प्रशिक्षण विद्यालय व वस्ती गृह विभाग गुरुकुंज आश्रम शाळा चालू झाले आहेत.

स्वराज्याचे सुराज्य झाले पाहिजे असे मला स्वप्न होते त्याच्या पूर्वीच्या ठिकाणी विविध विधायक प्रकल्प हाती घेतले. त्यातील काही प्रकल्प सिद्धिस गेले, उर्वरित प्रकल्प कार्यान्वित आहेत.

व्यक्तिमत्वातील दोन पैलू : परमार्थपरता आणि समाजसन्मुखता

तुकडोजी महाराजांच्या व्यक्तिमत्वातील दोन पैलू विकसित होत गेल्याचे जाणवते. परमार्थपरता आणि समाजसन्मुखता असे ते पैलू आहेत. त्याची आई स्वभावाने प्रेमळ वृत्तीने धार्मिक होती. ती बाळ माणिकला भजने एकवीत असे. नेरी या गावाजवळ भूतेस्वर मंदिराच्या भोजपत्रावरील एक पुरातन अध्यात्म ग्रंथ वाचून बालयोगी माणिकने रामदेगीच्या वनात अध्यात्म साधना केली.

ओंकारेश्वर हरिद्वार पुष्कराज पशुपतिनाथ अशा तीर्थक्षेत्रांची भ्रमणयात्रा त्यांनी केली. त्या भ्रमंतीत वशिष्ठ महाराज, लष्करीबाबा व दादाजी धुनिवाले अशा सत्पुरुषाचे दर्शन त्यांना घडले. आडकोजी महाराज आणि सातळी कोतळीकर महाराज यांनीही त्यांच्या संस्कारक्षम मनावर धर्मतत्त्वे रुजविली. ढोल, शंक, खंजिरी, एकतारी या वाद्यांच्या तालावर भजने व कीर्तने करून समाजात त्याने धर्मजागृति केली. या ध्यानधारणेतून त्यांचे व्यक्तित्व अध्यात्म तिने उजळून निघाले.

तुकडोजी महाराजांनी पंढरपूरला संत संमेलन घडवून आणले अखिल भारतीय पातळीवर त्यांनी भारत साधू समाज स्थापन केला. यातूनच ते यथावकाश जनजागरण करण्याकडे वळले. लोकशिक्षण साधण्याचे व्रत त्यांनी अंगिकारले तो काळ देशाच्या पारतंत्र्याचा होता 1942 च्या चळवळीत ते सहभागी झाले समाजबांधवांसाठी स्फूर्तीदायी भजने त्यांनी सादर केली. महाराज गाऊ लागली.

"अब काय को धूम मचाते हो, दुखवाकर भारत सारे ।
आते है नाथ हमारे।"
"झाड – झडूले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना ।
पत्थर सारे बॉम्ब बनेंगे । नाव लगेगी किनारे ।।"

अशा क्रांतिकारक भजनामुळे इंग्रज सरकारची वक्रदृष्टी महाराजाकडे वळवली. ऑगस्ट 1942 मध्ये त्यांना शिक्षा झाली व काही महिने कारावास घडला.

महाराज वर्ण गोरा होते तसेच देहान धिप्पाड देहाचे व उंच होते. त्याचे नेत्र तेजस्वी होते. बोलके होते राहणी साधी होती ते शुभ्र वस्त्र परिधान करीत. त्याचे अनुयायी भगवी लालसर रंगाची टोपी घालत. आठवड्यातून दोन दिवस प्रभात फेरी निघे. संध्याकाळी एखाद्या चौकात महाराजांचे प्रवचन 'खंजिरी नामक' त्यांच्या वाद्यांच्या तालावर त्यांचे भजन खुपच रंगत असे. महाराज खर्जात गायचे. खंजिरी सतत वाजवायचे ते वाद्ये त्यांचे जीव की प्राण होते.

1948 मध्ये वर्धा येथे देश-विदेशातील शांतिदूतांनी तुकडोजी महाराजांच्या भजनांची मुक्तकंठाने स्तुती केली होती. महाराज जपान मध्ये गेले होते. तिथल्या परदेशी परिषदेने सर्व धर्मीय प्रतिनिधीना त्यांनी शख्यभावाचा व सौख्याचा संदेश दिला. जगातील 18 राष्ट्रांच्या आम - समितीने महाराजांना सन्मान्य सल्लागार म्हणून नियुक्त केले होते

महात्मा गांधी, पंडित मालवीय, डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित नेहरू, आचार्य विनोबा भावे, भाई जयप्रकाश नारायण, साने गुरुजी अशा महामानवांनीही तुकडोजी महाराजांच्या असामान्य कर्तृत्वाच्या गौरव केला होता तसेच महाराज त्या काळात जनसामान्यांचा अंतकरणात आदराचे स्थान सदैव उत्कटपणे बाळगून होते त्यांना मनोमन मानणारा विशाल जनसमूह सर्वत्र विखुरलेला आहे. महाराजांचे विचार उच्चार व आचार उदात्त स्वरुपाचे होते. "**बोले तैसा चाले । त्याची वंदावी पावले** ।" याचा वस्तुपाठ त्यांच्या व्यक्तित्वात प्रतीत होत असे. महाराज आत्मनिवेदन करताना सांगतात.

"काय योगाचे साधन । थोडे अध्यात्म वाचन ॥
विशेष विश्व - निरीक्षण केले मनाने सर्व काळ ॥"

- महाराजांच्या प्रभावी व्यक्तिमत्वाचे मर्म त्यांच्या उद्गारात अनुस्यूत झाले आहे.
तुकडोजी महाराजांनी आपली अंतिम इच्छा पुढील शब्दात लिहून ठेवली आहे.

"अखिल मानव समाजाचे कल्याण व्हावे या उद्देशांनी स्वतःचे उभे आयुष्य मी ईश्वर सेवेत आणि राष्ट्र सेवेत घालवले आहे. माझी मालमत्ता ही माझी नसून या कामासाठी निर्माण केलेल्या श्री गुरुदेव सेवा मंडळाची आहे. सद्गुरु आडकोजी महाराज यांना माझ्या आई बापांनी मला दान केले आहे. त्यामुळे माझ्या कोणत्याही दैहीक वारसाचा किंवा नातलगांचा माझ्या संपत्तीवर कोणताही कायदेशीर अधिकार मी मानीत नाही. माझ्या नावे असलेली सर्व स्थावर व जंगम जिंदगी हे अखिल भारतीय श्री गुरुदेव मंडळाला मी दिली आहे" मित्रहो, गुरुदेवांच्या आज्ञेने माझा प्राण त्यांच्या चरणी विलीन झाला, तर माझ्या पार्थिव देहास गुरुकुंज आश्रमात न्यावे. महाव्दारासमोर हायस्कूलच्या मैदानात प्रार्थना मंदिरातून दिसेल अशा सुंदर ठिकाणी माझ्या पार्थिव देहाला अग्नी द्यावा तिथे पंचवटी झाड लावावे. मंदिर मुळीच बांधू नये. प्रार्थनेनेच सर्व काही करावे. चितेच्याभोवती फक्त शांतीपाठ आणि जयघोष करावा. देवाच्या दयेने पुन्हा जन्मलो, तर जनता जनार्दनाची फिरून एकदा सेवा करीन नाहीतर हाच माझा सर्वांना जय गुरुदेव!

महाराजांचे अखेरचे मनोगत केवढे उदात्त आणि हृदयस्पर्शी आहे, त्याच्या भव्य व्यक्तित्वाला साजेल असे त्यांचे प्रकट चिंतन आहे. देवापासून गावापर्यंत, रावावापासून रंकापर्यंत आणि मन: शांतीपासून जन:शांती पर्यंत त्यांच्या व्यक्तित्वाची झेप होती. त्यांच्या संतत्वाला राष्ट्रीय विचारांचे अधिष्ठान होते आणि त्यांचे राष्ट्रीयत्व संतवाणी गंधित झाले होते. त्यांचे व्यक्तित्व जीवनाचे सर्वांगसुंदर असे प्रतीत होते. "आधी अध्यात्म - जीवन : पुढे समाजकारण असाच त्यांचा जीवन आलेख आहे.

सर्वस्पर्शी राष्ट्रकार्य

तुकडोजी महाराज हे जसे श्रेष्ठ संत होते, तसेच ते सर्वस्पर्शी राष्ट्रकार्य करणारे समाजधुरीण होते. आपल्या अपूर्व खंजिरी भजनामुळे एक आत्मानुभवी सत्पुरुष म्हणून ते समाजापुढे आले आरंभ काळात त्यांच्या स्वयंस्फूर्त भजनांतून भगवतभक्तीचा आवेग आणि आवेश जाणवत होता, लाखो खेडुतांची अंत:करणे हेलावून टाकण्याची किमया त्यांच्या भजनांनी घडविली होती. पण या भजनाच्या निमित्ताने त्यांनी जी भ्रमंती केली त्यातून त्यांना समाजातील बदल दिसले. त्यामुळे त्यांच्या भजनांचा सूर पालटला. अनिष्ट रुढीचे व अंधश्रद्धांचे निर्मूलन, दलितोध्दार, समाज संघटन, ग्रामोद्योग, शेती सुधार स्त्री मुक्ती बुवाबाजीचे निखंदन, श्रमप्रतिष्ठा, व्यसनमुक्ती, स्वावलंबन व ग्रामोध्दार इत्यादी याविषयीचे प्रबोधन त्यांच्या खंजिरी भजन आतून

दुमदुमू लागले कळवळयाची जाती । लाभावीण करी प्रीती, अशा सामाजिक करुणतेने ते समाज बांधवाना आवाहन करू लागले.

समकालीन संत मंडळांमध्ये तुकडोजी एक थोर राष्ट्रीय नेते होते आणि राष्ट्रीय नेत्यांच्या समूहातील ते एक वंदनीय संत होते. राष्ट्रीयत्व संतत्व यांचे एक अद्‌भुत रसायन फ्यूजन त्यांच्या व्यक्तिमत्वात झाले होते. त्यामुळेच राष्ट्रसंत ही उपाधी गुणग्राही लोकांनी त्यांना दिली. ती उपाधी तुकडोजींना शोभून दिसली आत्मोध्दार आणि राष्ट्रोध्दार यांचा संगम त्यांच्या ठिकाणी झाला होता.

भारतातील परकीय राजवटीच्या काळात गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्राम सुरु झाला होता. तुकडोजी महाराजांनी आपल्या स्फूर्ति गीतांनी या आंदोलनाला भरपूर हातभार लावला जनमानसात पारतंत्र्याची चीड व स्वातंत्र्याची चाड निर्माण करण्यासाठी त्यांच्या झंझावती भजनाची मोठीच मदत झाली.

स्वराज्य प्राप्तीनंतर जातीय ऐक्य, ग्रामस्वराज्य, स्त्रीशिक्षण, दुराचार निर्मूलन अशा विविध कार्यात महाराजांनी स्वतःला झोकून दिले.

जन तेचि जनार्दन या एकनाथाचे उक्तीचा प्रत्यय त्यांच्या भजनातून समाजातला सतत येत होता महाराजांनी खंजिरी अन्यायी सत्ताधिशांच्या पोटात जणू खंजिरच खुपसत आहे असे वाटावे, इतकी धारदार होती "कोणी करणी कौटाळ म्हणती | कोटी पिशाचे भारती |

औषध न देता रोग मारती | मूर्खपणाने |
भगत मांत्रिक अरबाडी जाणते | धुमारे बघती भावीक कोणते |
पोटासाठी नाना मते | फैलवती लोकामांजी ||
करावविति नवससायास | थोर देवपूजेचा जोर सोर ||
रेडे, बकरे, कोंबडी पामर | कापताति अज्ञाने ||"

आपल्या अशा प्रखर ओव्यातून महाराजांनी जनजागृतीचा वसा निष्ठेने चालविला. अधिकारी संत व ढोंगी बुवा यांच्यात गफलत होऊ नये. म्हणून खऱ्या संताजी लक्षणे सांगताना महाराज म्हणतात.

संसारी असूनही संत असती | व्यवहारी राहोनि आदर्श होती||
बुवा न म्हणविताही अधिकार ठेविती| सद्‌गुरूचा ||"

ग्रामीण भागातील अडाणी जनतेला धर्माच्या नावाखाली फसविणा-या व बुवाबाजी करणाऱ्यां लबाड लोकांवर महाराजांनी कडक ताशेरे ओढले आहेत अंधश्रद्धेविरुद्ध त्यांनी केलेली जागृती अपूर्व आहे.

दिनांक 30 जुलै 1954 रोजी जपानमधील शिमझि या शहरात भरलेल्या विश्वधर्म परिषदेचे महाराजांनी उद्घाटन केले खंजिरीवर थाप मारून त्याने 'हर देश मे तू हर वेश मे तू हे' भजन म्हटले. त्यांची ओजस्वी वाणीने ऐकून घेतला प्रचंड जनसमुदाय भारावून गेला. व परिषदेच्या प्रमुखांनी महाराजांना विश्वधर्माचा केंद्रासाठी एका सुंदर पाहाडावर दहा हजार मीटर भूमी देऊ केली. तो प्रस्ताव नाकारताना महाराज म्हणाले, मला या मोहात ओढू नका. माझ्या भारतात माझ्यासाठी अजून खूप काम आहे' **महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन**

महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन पुरोगामी आहे. कुटुंबातील महत्त्वाचा घटक असणारे श्री उपेक्षित कशी राहिली तिच्या व्यथा-वेदना कोणत्या जीवनातील समस्यांचे निराकरण करण्याचे कार्य महाराजांनी आपल्या वडिलांच्या भाषणांच्या व साहित्याच्या माध्यमातून केली तिचे प्रगत जीवन केवळ कुटुंबियच नव्हे तर साऱ्या समाजाला हे असे कसे उपयुक्त ठरू शकते याच्या साधार विवेचन त्यांनी ग्रामगीतेतील महिलोन्नती नामक अध्यायात केले आहेत ते म्हणतात-

"स्त्रीलाच भक्ती, स्त्रीलाच ज्ञान | तिलाच संयम, शहाणपण |
तिच्यानेच हालती वाटते संपूर्ण| संसार चक्रे ||"

तुकडोजी महाराजांनी समाजसेवेचे अनेक विविध उपक्रम यशस्वीपणे राबविले स्वावलंबन सेवा स्वच्छता नवनिर्माण व राष्ट्रीय एकात्मता या उपक्रमात स्वतंत्र सप्ताह श्रमदान यज्ञ समजदार यज्ञ राष्ट्र धर्म जागृती प्रचार यात्रा ग्राम निर्माण पर्व या कार्यक्रमाची नावे पाहिली म्हणजे धर्मकारण व समाजहित चिंतन यांचा त्याने साधलेला समन्वय लक्षात येतो 1948 आली सेवाग्राममध्ये देशी-विदेशी शांती दुतांचा मेळावा भरला होता आणि नेत्यांनी त्यासाठी महाराजांना प्राचारण केले. तेव्हा महाराजांचे कार्यक्षेत्र चौफेर विस्तारले.

सर्वोदय, हरिजन, महाराष्ट्रीय व्यापारी, राष्ट्रभाषा प्रचार, सेवा संघ, विधायक कार्यकर्ते, भूदान विद्रोही साहित्य भारत सेवक समाज नशाबंदी असे उपक्रम राबविणाऱ्या संमेलन त्यांनी गाजवली अनेक योजनांना आधार दिला.

पंजाबातील वेदान्त परिषद, नागपूरची मुद्रण परिषद, गोंदियाची तमाशा परिषद यांच्यामार्फत पंढरपूरचे संत संत संमेलन सिद्धीस नेले. निजामाच्या राज्यात रझाकारांच्या प्रतिकारक शक्ती संवर्धन केले पुण्यातील पानशेत –प्रलय, नागपूरचा हिंदू– मुस्लिम दंगा, कोयना– भूकंप अशा प्रत्येक सकटात ते धावून गेले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघात व भारत सेवादलात जाऊन त्यांनी **'जागो उठो वीरो, अब तुम्हारी बारी है ।'** व तुम्हारी भारी आहे असा संदेश दिला.

'कर्तृत्वाचा उंच हिमालय' म्हणजे तुकडोजी महाराज होत!

'ग्रामगीता' हा पद्यमय ग्रंथ साडेचारशे पृष्ठाचा हे प्रत्येकी पाच विषयांची एक पंचक 108 पंचके त्यात आहेत. सद्धर्ममंथन, लोकवशीकरण, ग्राम निर्माण, दृष्टिपरिवर्तन, संस्कारशोधन प्रेम आदर व्यवस्थापन देवत्व साधन आणि आदर्श जीवन असे आठ विषय या ग्रंथात मांडलेले असून शेवटी ग्रंथ महिमा स्पष्ट केला आहे.

धर्माध्ययन, आश्रमधर्म, संसार व परमार्थ, आचार– प्रॉबल्य, सेवा– सामर्थ्य, संघटन– शक्ती, ग्राम– रक्षण, जीवन– रक्षण, महिलोन्नती, वैवाहिक जीवन, यात्रा– मेळे, प्रार्थना –विश्वधर्म, दलीत– सेवा, भजन– प्रभाव, संत– स्वरूप, प्रयत्न– प्रभाव, आत्मानुभव, ग्राम– कुटुंब, ग्रंथाध्ययन अशी त्या आठ पंचकातील काही प्रमुख विषयांची नावे जरी पाहिली तरी ग्रामगीता ग्रंथाचा आवाका किती व्यापक आहे ते लक्षात येईल.

ही ग्रामगीता लिहिण्याची प्रेरणा आपल्याला कशी झाली हे स्पष्ट करताना महाराज म्हणतात –

"पुण्यक्षेत्र पंढरपुरी ।बसलो असता चंद्रभागे तीरी ।।
स्फूरु लागली ऐशी अंतरी ।विश्वाकार वृत्ती ॥
जानावे ग्राम हेचि मंदिर ।ग्रामातील जन सर्वेश्वर।
सेवा हेचि पूजा समग्र ।हाच विचार निवेदिता ।।"

खरा भारतीय समाज अजुनही खेड्यातच आहे. ही ग्रामगीता त्या समाजाला अनुलक्षून लिहिलेली आहे. धर्मशिलतेचा धागा न तोडता आधुनिक परिस्थिती, अनुरुप अशा रीतीने कशी बदलता व सुधारता येईल, याचे प्रतिपादन मोठ्या जाणिवेने व जिव्हाळ्याने महाराजांनी ग्रामगीतेत केले आहे.

" देवघरात शांतपणे तेवणाऱ्या नंदादीपाप्रमाणे हे पुस्तक आहे" असे वि.स. खांडेकर म्हणतात. महाराजांनी ग्रंथ लिहून ग्राम सुधारणेच्या कार्यात मोठी मदत केली आहे " असा सोनोपंत दांडेकर यांचा अभिप्राय आहे. . "नवभारताच्या निर्मितीत ग्रामसुधारण्याचे महत्त्व ओळखून त्याप्रमाणे कार्य करण्याची दिशा या गीतेत महाराजांनी दाखविली आणि अध्यात्म व व्यवहार यांची सुंदर मिलन येथे झाले आहे." या शब्दात डॉ. वि. भि. कोलते यांनी ग्रामगीता ग्रंथाचा गौरव केला आहे. या ग्रंथातील वाणी प्रासादिक आहे. तसेच विषय प्रतिपादन यांची शैली ग्रामीण जनतेस पाहिजेत तशी सुबोध आहे " असे पं. श्री. दा. सातवळेकर सांगतात. "ग्रामगीता स्वानुभव –संमत आहे आणि शास्त्र –संमतही आहे" असे समाधान विनोबांनी व्यक्त केले.

स्तवनांजली, प्रभू प्रार्थना, नरदेह सार्थक, नाममहिमा, भक्तिमार्ग प्रकाश भक्तीची आरत्या संगतीने बंधू वसंत आरक्षणे गुरुभक्ती संन्यास व कर्मयोग संसार चक्र विधान तज्ञ अध्याय पहिला हात मजुरी इत्यादी विषय पर अपने पहिल्या भागात दिली आहेत अध्यात्म भागातील पुढच्या विषयाचे विवेचन दुसरा भाग केलेले आहे.

अध्यात्म मार्गातील पुढच्या विषयाचे विवेचन दुसऱ्या भागात केलेले आहे. ईश्वर दर्शनोत्कंठा, अनुताप तीर्थक्षेत्र, पंढरपूरचा सुखसोहळा, आत्मस्थिती, उपासना रहस्य, सुखदुःख विवेक, परमार्थमय प्रपंच व आत्मोन्नतीचा मार्ग असे प्रमुख टप्पे निवेदिलेले आहेत.

पंढरीनाथ दर्शन सद्भक्त स्मरण, कृष्णलीला, भाव कुंज, श्री गुरु आडकोजी, पुरुषार्थ, वैराग्य, योगगुंफा वगैरे विषयाची चर्चा तिसऱ्या भागात केली आहे.

'आत्मकथा ' चौथ्या भागात सादर केलेली आहे. जन्म व बालपण, चिमूर, नेरी व अरण्य फेरी, जन्मभूमी, स्मृतिचित्रे वगैरे विषयाच्या संदर्भात महाराजांनी स्वतःच्या जीवनातील काही घटकांवर प्रकाश टाकला आहे.

प्रस्तुत ग्रंथ म्हणजे महाराजांचा भक्तिमार्ग प्रदीप आहे. 'तुकड्यादास म्हणे असोनी संसारी| जीवभाव दूरी करून पाहे। 'असा अनासक्त प्रपंच योग यात वर्णिला आहे. ' जिकडे न्यावी ही लेखणी| तिकडे शब्दाची मोहिनी | अशी रससंपन्नता विषयी इथे आहे ये गा एकान्ती विठ्ठला । जीव भेटाया भुकेला, अशी प्रासादिक वाणी आहे.

"मुरल्या इंद्रियांच्या वाटा । जळुनि विषयाच्या काटा ।। " अशी सिद्धाअवस्था निवेदनातून मांडणारी अभंग त्याच्या आत्मानंदाची अक्षय मंजुषा आहे.

तत्त्वचिंतन आणि जीवनदृष्टी

तुकडोजी महाराजांनी जीवनदृष्टी पुढील भागातून नेमकेपणाने व्यक्त झाली आहे.

"भक्ती सर्वांना कळू यावी अंगी | म्हणोनी प्रसंगी सेवा केली ||
वेदांताचा अर्थ कर्मे आकळावा | म्हणोनिया सेवा केली ॥
धर्माचे ते वर्म व्यवहारी कळावे | म्हणोनिया भावे उदगारलो ||
तुकड्यादास म्हणे तत्त्व द्यावे हाता || ऐसा आहे चिंता भाव माझ्या||
"मानवधर्म श्रेष्ठ सकाळाहुनी, त्याची शिकवण मिळे तिथे ||
नीच - उचता सोडून सगळे, बसले दिसते एक मतें ||
आधी अध्यात्म- जीवन | पुढे समाजकारण ||
आधी आचरोनी घ्यावें | मग जनलोका सांगावे ||
आधी भक्तीने रंगावे | मग जना नाचवावें ||
तुकड्या म्हणे अनुभव | लोक चाहताती सर्व ||"

– आपल्या मनात होत गेलीली उत्क्रांती अभंग गाथे च्या आरंभी व्यक्त करताना महाराज म्हणतात," भाविकांच्या तोंडून साधू संतांची भजने ऐकून मला पंढरीची वेड लागले, मी ईश्वराच्या चिंतनाशिवाय या जगाचे सर्व प्रकारचे व्यवहार व समाजसेवा यांना कवडीमोल समजत असे मात्र भक्ती भावाच्या मार्गतही क्रमाक्रमाने परिवर्तन होते. ते आवश्यकही असते. देव आणि त्यांची सेवा करण्याची मार्ग हा आपल्या आंतरीक विकासाबरोबरच निराळ्या स्वरूपात समोर येतो. तसे होण्यातच प्रगती होण्यातच प्रत्यंतर आहे! "

महाराजांचे अनेक अभंग आधुनिक विचारांनी भरलेले आहेत त्यांच्या जीवनाच्या विकासाबरोबरच त्यांच्या अनुभवांना एक वळण लागले आहे त्यांचे विचार संतत्वाकडून राष्ट्रत्वाकडे उत्क्रांत होत गेलेले आहेत ते म्हणतात –

"सर्वांभूती परमेश्वर | त्यासि बाधक नसे सत्य व्यवहार ||
करावे संघटनेने गाव सुंदर || ही पूजाचि तयाची ||"

तुकडोजी महाराजांनी आपला संपूर्ण समाज सात्विक आरोग्यसंपन्न सर्वगुणसंपन्न व्हावा अशी आस लागली होती, आपल्या अंतर्गत स्वप्न खुलवणारे दिशा त्यांनी आपल्या समग्र साहित्यातून सूचित केले आहे वास्तविक पाहता त्यांचे शालेय शिक्षणही जेमतेम झाले होते. पण समाजजीवनाचा ग्रंथ त्यांनी कसोशीने अभ्यासला होता प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर घासून पाहावी आणि आत्मज्ञानाची जोड देऊन जीवनात रहावेत अशी त्यांची दृष्टी होती महाराज सांगतात –

"केले मंगळावरी उड्डान | चढला हिमगिरी - शिखरी पूर्ण ||
शोधिले अग्निअस्त्र, अनुअस्त्र महान । हैड्रोजनागृदी ॥
ऐकती करोडो मैलावरून । परस्परांचे गायन- भाषण ॥
विश्व हे आटोक्यात आणून ॥ घर केले रहाण्याचे ||"

एकंदरीत धर्मकारण, आणि राजकारण धार्मिकता आणि राष्ट्रीयता आध्यात्मिक शांती आणि सामाजिक क्रांती व्यक्तिगत सद्वर्तन आणि सामूहिक परिवर्तन या गोष्टींचा समतोल आणि समन्वय साधावा आणि त्याद्वारे नवधर्म व नवसमाज यांच्या संस्थापनेचे कार्य केले पाहिजे, हाच महाराजांच्या जीवनाचा संदेश आहे, ते स्वतः कर्ते सुधारक होते, राजनीति म्हटली स्वार्थ सत्तापिपासू प्रवृत्ती असा सर्वसामान्यपणे समज झालेला

असतो पण महाराजांनी विशुद्ध राजनितीचे पाठ दिले राजनीति पवित्र व स्वच्छ असली पाहिजे, असे त्यांनी निक्षून सांगितले. देशाचे नेतृत्व नि:पृह, नीतिमान व कर्तबगार व्यक्तीच्या हातात असावे असे, ते सांगतात.

महाराजांची ग्राम साम्राज्याची कल्पना अशी आहे.
"अवघाचि संसार व्हावा सुखी | मंगलता निघो सर्वमुखीं ।।
खळ– दूर्जनांचीही दृष्टी निकी । व्हावी सर्वदा ।।
मित्रता नांदावी सर्व जनीं । उणीव न दिसावी कोठे कोणी ।।
जी जी इच्छा करिती प्राणी । तोच धर्म, तेचि ज्ञान रोकडे ।।
तुकड्या म्हणे, समाधन जोडे । सकळ जनांसि ||"

महाराजांच्या विचारसरणीवर ज्ञानदेव व रामदास यांच्या विचारधारेचा प्रभाव असल्याचा जाणवते. येथील खळ– दूर्जनांचीही दृष्टी निकी व्हावी ही इच्छा हि ज्ञानदेवांच्या 'जे खळांची व्यंकटी सांडो। या अपेक्षेची आठवण करून देते 'मित्रता नांदावी सर्व जणी आणि 'भूता परस्परे पडो मैत्र जिवांचे|' यातील साम्य लक्षणीय आहे तसेच मंगलता निघो सर्वसुखी। ही सिदच्छा सर्व मुखी मंगल बोलवावे या समर्थ रचना सारखीच आहे.

संत गाडगेबाबा आणि संत तुकडोजी महाराज

संत गाडगेबाबा आणि संत तुकडोजी महाराज हे दोघे समकालीन होते. दोघेही विदर्भातील अमरावती जिल्ह्यातून आले होते आणि गाडगेबाबा तुकडोजीपेक्षा वयाने तेहतीस वर्षांनी मोठे होते. पण गाडगेबाबांना तुकडोजींच्या कार्याबद्दल अतिशय आस्था होती. तसेच तुकडोजींना गाडगेबाबांच्या कर्तृत्वाविषयी परमादर होता. सातपुड्याच्या गुहेत तुकडोजांनी खंजिरी भजने केली. तिथे त्यांनी गाडगेबाबांना सन्मानाने बोलावले आणि त्यांनी बाबांचे कीर्तन घडवून आणले. तुकडोजी भजन आणि गाडगेबाबांनाचे कीर्तन ऐकून श्रोते तृप्त झाले.

आधुनिक संताच्या मालिकेत गाडगेबाबा व तुकडोजी या दोन संतांचे स्थान सर्व सर्वस्वी पृथगात्म आहे. दासगणू महाराज, स्वामी स्वरूपानंद गुलाबराव महाराज, दादामहाराज सातारकर, साखरे महाराज प्रभृती आधुनिक संत थोर सत्पुरुष होते. पण त्याचे कार्य परमार्थ– साधनेपुरते सीमित होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी राष्ट्रांच्या उभारणीमध्ये दिलेले योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे आणि अनमोल शेजारी भारतातील किड्यांची संख्या लक्षात घेऊन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी प्रारंभी ग्रामविकास हाच ध्यास हे तत्त्व स्वीकारले. त्यांच्यामध्ये गावाचा विकास झाल्याशिवाय राष्ट्राचा विकास होऊ शकत नाही समाजातील सर्व घटकांतील लोकांचा उद्धार कसा होईल याविषयी त्यांनी चिंतन करून लोकांचे प्रबोधन केले ग्रामविकास आणि ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा केंद्रबिंदू होता ग्रामस्तरावरील त्यांना वाचा फोडत त्या सोडविण्यासाठी त्यांनी उपाययोजनाही सुचविल्या योजना त्यांच्या काळात उपकारकच ठरलेल्या आढळतात.

संदर्भ ग्रंथ सूची

1) राष्ट्रसंत: वैचारिक क्रांती– लेखक प्रा. बाळ पदवाड, प्रथमावृत्ती 15 ऑक्टोबर 1984 विजय प्रकाशन, नागपूर
2) मानवतेचे मानवतेचे महापुजारी, राष्ट्रसंत तुकडोजी (जीवन व कार्य) लेखक– प्रा. रघुनाथ कडवे द्वितीय आवृत्ती 11 ऑक्टोबर 2012 अमोल प्रकाशन नागपूर
3) 6 वे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन, ऑक्टोबर – डिसेंबर 2018
4) सत्वधारा – वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य संमेलन विशेषांक – 2014 संपादक डॉक्टर विजय कुलकर्णी डॉ. कृष्णा साकुळकर
5) संत–संकीर्तन डॉ. हे.वी इनामदार, प्रतिमा प्रकाशन, पुणे 30 प्रथमावृत्ती 2 सप्टेंबर 2001
6) तंटामुक्त गावाची गीता – वंदनीय राष्ट्रसंताची ग्रामगीता: राजेश खवले, पहिली आवृत्ती 13 फेब्रुवारी 2008 प्रकाशन, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम, तालुका– तिवसा जिल्हा अमरावती

7) ग्रामगीता– वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज संपादक स्व. सुदाम सावरकर एकोणतिसावी आवृत्ती 2016 श्री गुरुदेव प्रकाशन गुरुकुंज आश्रम तालुका तिवसा जिल्हा अमरावती
8) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – व्यक्ती आणि वांङमय संपादक – अक्षयकुमार काळे, प्रथमावृत्ती 15 ऑगस्ट 2008 प्रकाशक विसा बुक्स नागपूर